**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर- १४३२/२०२२**

**अपिलार्थी, श्री.तेजस बाळकृष्ण यादव,**
साईतेज व्हिला मोगलवाडी, रिक्षा स्टँड जवळ,
खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड ४१० २०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (माध्यमिक),
शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग,
शिवतीर्थ, ता.अलिबाग, जि.रायगड.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (माध्यमिक),
शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग,
शिवतीर्थ, ता.अलिबाग, जि.रायगड.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १२.११.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०२.२०२२ | -- | १४.०३.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०६.०५.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडून माहिती अप्राप्त असल्यामुळे* "असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १२.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.बाळकृश्ण ज्ञानू यादव उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.शर्मिष्ठा शेंडे, गटशिक्षणाधिकारी यांचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुदेश विश्वनाथ दिघाडे, मुख्य लिपिक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक रायगड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" छत्रपती शाहू महाराज माध्यमिक विद्यालय, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड या शाळेतील दि.३०.११.२०२१ रोजी सेवानिवृत्त झालेल्या एका शिक्षक पदामुळे सद्यस्थितीत १४ शिक्षक पदांव्यतिरीक्त जादा वेतन अदा होत असल्यास १४ पेक्षा जास्त शिक्षक पदांच्या वेतनाबाबतचा संपूर्ण तपशील मिळणेबाबत. "*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उपस्थित अपिलार्थी यांच्या प्रतिनिधींनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली असल्याने, सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीची आवश्यकता नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ नोव्हेंबर, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**